# *वार्तापत्र*

कार्यालय पोलीस अधिक्षक,
गडचिरोली दिनांक:- ०३/०३/२०१८

## पोलीस *पाटील कार्यशाळा संपन्न*

आज रोजी मा. प्रभारी पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी सो. यांच्या मार्गदर्शनाखाली व अध्यक्षतेखाली गडचिरोली जिल्हयातील पोलीस पाटील यांची कार्यशाळा पोलीस मुख्यालय गडचिरोली येथील एकलव्य हॉल येथे दुपारी ०३.३० वा. आयोजीत आयोजीत करण्यात आली होती. सदर कार्यशाळेस जिल्हाभरातून ६०० पोलीस पाटील उपस्थित झाले होते.

मा. उपविभागीय पोलीस अधिकारी गडचिरोली डॉ. सागर कवडे सो. यांनी कार्यक्रमाच्या सुरवातीस पोलीस पाटील यांचे अधिकार व कर्तव्य याबाबत उपस्थित पोलीस पाटील यांना मार्गदर्शन केले. तर पोलीस निरीक्षक श्री. सांगळे सर यांनी जातपंचायती बाबतच्या कायदयाविषयी उपस्थितांना मार्गदर्शन करून जातपंचायत घेणे हा गुन्हा असून त्याबाबतच्या कायदयाविषयी माहिती दिली.

यावेळी मुक्तीपथाचे प्रमुख डॉ. गुप्ता यांनी दारू व तंबाखु याचे आर्थिक व सामाजिक जीवनावर होणारे परिणाम विषद करून त्याबाबतच्या कायद्याची माहिती संबंधितांना दिली. आपल्या अध्यक्षीय भाषणात मा. प्रभारी पोलीस अधिक्षक गडचिरोली डॉ. महेश्वर रेड्डी सो. यांनी गडचिरोली सारख्या दुर्गम व अतिदुर्गम भागात पोलीस पाटील हे पोलीस दलाचा एक महत्वाचा घटक असल्याचे सांगून भविष्यात जास्तीज-जास्त सक्रीय राहून

आदिवासींच्या विकासासाठी आपण काम करावे असे आवाहन त्यांनी उपस्थित पोलीस पाटील यांना केले.

यावेळी कार्यक्रमास जिल्हाभरातून ६०० पोलीस पाटील उपस्थित होते.